ESTD 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय : दिपावली/ईद सणासाठी अग्रीमाबाबत..**

विद्यापीठातील सर्व प्रशासकीय सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, प्रतिवर्षी विद्यापीठ सेवेत कायमस्वरुपी असणाऱ्या प्रशासकीय सेवकांना दिपावली / ईद या सणासाठी रू.10,000/– किंवा 15,000/– इतकी रक्कम अग्रीम स्वरूपात देण्यात येते.

उपरोक्त नमुद केलेनुसार जे प्रशासकीय अधिकारी/सेवक/तांत्रिक सेवक दिपावली / ईद सणासाठी अग्रीम घेण्यासाठी इच्छुक आहेत त्या सर्व सेवकांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या **Employee Corner** येथून संगणक प्रणालीद्वारे **Online** अर्ज भरून त्याची 01 रुपयांचे रेव्हयून्यू स्टॅम्प लावून स्वाक्षरीसहीत प्रत दिनांक **08 ऑक्टोबर 2025** पूर्वी पगार पत्रके विभागामध्ये सादर करावी. सदरचा Online अर्ज भरणे अनिवार्य असून मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच, संगणक प्रणालीमध्ये अर्ज सादर करताना **अग्रीम रक्कम (रू. 10,000 / रू. 15,000), युको बँकचा संपूर्ण बचत खाते कमांक, Employee Code Number** बिनचूक टाकावा व सदर अर्जाची हार्ड कॉपी पगारपत्रके विभागात स्वाक्षरीसह जमा करावी.

वित्त व लेखाधिकारी

संदर्भ क. शिवाजी वि./लेखा/पगारपत्रके / 304
दिनांक : : 24 SEP 2025 ऑक्टोबर 2025

प्रति :– सर्व अधिविभाग प्रमुख व सर्व कार्यालयीन विभाग प्रमुख, उपकुलसचिव/सहा. कुलसचिव यांनी सदरचे परिपत्रक संबंधीतांच्या निदर्शनास आणावे. तसेच आपल्या विभागामध्ये वर्ग 04 चे जे सेवक कार्यरत आहेत त्यांना सदरचा अर्ज भरून देणेबाबत सहकार्य करावे.

प्रत :– स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरू/ कुलसचिव/संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ/ वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.

<u>दिपावली अग्रिमसाठी अटी</u>

1. नियमित सेवेत असलेल्या पूर्णवेळ सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवक/तांत्रिक सेवक यांना त्यांचे मागणीनुसार रूपये 10000 किंवा रू. 15000/– इतका अग्रीम मिळू शकेल.
2. अग्रीम रक्कम दिल्या जाणाऱ्या महिन्यापासून ज्या सेवकांची एकूण सलग नोकरी अकरा महिन्यांपेक्षा कमी मुदतीची आहे अशा सेवकांना सदरचा अग्रीम मिळणार नाही.
3. दिलेली अग्रीम रक्कम दहा मासिक हप्त्यात पगारातून कपात करण्यात येईल.
4. अग्रीम परतफेडीचा हप्ता ज्या महिन्यात दिपावली असेल त्या महिन्याच्या पुढील महिन्यापासून घेतला जाईल.
5. अग्रीम स्वीकारणा–या व्यक्तीने नोकरीचा राजीनामा दिल्यास अथवा त्याच्या नोकरीची समाप्ती इ. गोष्टी घडल्यास सण अग्रीम रक्कम एक रक्कमेने परत करीन, असे लेखी निवेदन देणे अवश्यक राहील. त्यांना मिळणा–या मासिक वेतन व इतर मिळणा–या रक्कमेमधून उरलेल्या हप्तांच्यी वसुली करण्यात येईल.
6. सदरचा अग्रीम वर्षातून एकच वेळ दिला जाईल.
7. ज्या सेवकांची मागील अग्रीम वसुली झालेली नाही अशा सेवकांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही
8. ऑनलाईन अर्जाची 1 रुपयांचे रेव्हयून्यू स्टॅम्प लावून स्वाक्षरीसहीत प्रत पगारपत्रके विभागात विहीत मुदतीत जमा करणे अनिवार्य आहे.
9. अग्रीम फॉर्म संगणक प्रणालीव्दारे ॲटो जनरेट होत असलेने जो संगणक प्रणालीव्दारे फॉर्म भरण्यात आलेला आहे तोच ग्राहय धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.